मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४७६ वा • सोमवार, ता. २२ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००



## एआयएफबीच्या डॉ. तांबे यांचा १६,६४४ मतांनी दणदणीत विजय

### नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पक्षाने उघडले खाते

**संगमनेर । रयत समाचार**

नगरपालिका निवडणुकीत राज्यात सर्वाधिक मताधिक्याची नोंद करत संगमनेर नगराध्यक्षपदी डॉ. मैथिली सत्यजित तांबे यांचा तब्बल १६,६४४ मतांनी दणदणीत विजय झाला. त्या All India Forward Block (एआयएफबी) या नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी स्थापन केलेल्या पक्षाच्या अधिकृत उमेदवार होत्या. सेनापती बापट हे या पक्षाचे महाराष्ट्राचे प्रमुख होते. एआयएफबीच्या 'सिंह' या निवडणूक चिन्हावर त्या विजयी ठरल्या. या निवडणुकीत एआयएफबी आणि संगमनेर सेवा समितीने अभूतपूर्व यश मिळवत ३० पैकी २७ नगरसेवक निवडून आणले. सत्यजीत तांबे यांच्या नेतृत्वाखालील या आघाडीने पहिल्याच प्रयत्नात राजकीय वर्तुळाला जोरदार धक्का दिला आहे. विशेष म्हणजे, शिवसेना (शिंदे गट)चे आमदार अमोल खताळ यांच्यासह महायुतीसमोर एआयएफबीने निर्णायक विजय मिळवत संगमनेरच्या राजकारणात नवे समीकरण निर्माण केले आहे. शहराच्या विकासासाठी ठोस निर्णय, पारदर्शक प्रशासन आणि सर्वसमावेशक धोरणांची अपेक्षा नागरिकांनी या निकालातून व्यक्त केली असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. हा विजय केवळ व्यक्तीगत नसून, पर्यायी राजकारणाला मिळालेली ठाम पावती असल्याचे चित्र संगमनेरमध्ये दिसून येत आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या एआयएफबीने निवडणूक जिंकून राज्यात खाते उघडले. एआयएफबीचे राज्य पदाधिकारी कॉम्रेड किशोर कर्डक यांनी आनंद व्यक्त करत दुजोरा दिला.

### अहिल्यानगर जिल्हा पक्षनिहाय नगराध्यक्ष संख्या

| अ.क्र. | राजकीय पक्ष | संख्या |
|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी (भाजप) | ७ |
| २ | शिवसेना (शिंदे गट) | २ |
| ३ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १ |
| ४ | ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक | १ |
| ५ | विकास आघाडी (राहुरी) | १ |
| | एकूण | १२ |

## टी-२० विश्वचषकासाठी सूर्यकुमार कर्णधार, अक्षर पटेल उपकर्णधार

### गिलला वगळले; ईशान किशन, रिंकू सिंहचे पुनरागमन

**मुंबई । रयत समाचार**

आगामी टी-२० विश्वचषक २०२६ साठी भारतीय संघाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. मुंबईतील बीसीसीआय मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया, मुख्य निवडकर्ता अजित आगरकर आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्या उपस्थितीत संघ जाहीर करण्यात आला. या विश्वचषकासाठी सूर्यकुमार यादवकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली असून अक्षर पटेल याची उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. संघनिवडीत सर्वात मोठा धक्का म्हणजे स्टार फलंदाज शुभमन गिल याला संघाबाहेर ठेवण्यात आले आहे. मात्र ईशान किशन आणि रिंकू सिंह यांचे संघात पुनरागमन झाले आहे. संघनिवडीबाबत माहिती देताना मुख्य निवडकर्ता अजित आगरकर म्हणाले की, सध्याच्या फॉर्मचा विचार करून शुभमन गिलला वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भविष्यातील मालिकांमध्ये गिलच्या पुनरागमनाची शक्यता खुली ठेवण्यात आली आहे. ईशान किशन आणि संजू सॅमसन या दोघांनाही यष्टीरक्षक म्हणून संधी देण्यात आली असून, मधल्या फळीत रिंकू सिंह फिनिशरची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. विश्वचषकाच्या तयारीसाठी भारतीय संघ ११ जानेवारीपासून न्यूझीलंडविरुद्ध ३ एकदिवसीय आणि ५ टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. ही मालिका विश्वचषकापूर्वी संघाची कसोटी ठरणार आहे. टी-२० विश्वचषकाची सुरुवात ७ फेब्रुवारी २०२६ रोजी कोलंबो येथे पाकिस्तान व नेदरलँड्स यांच्यातील सामन्याने होणार आहे. भारत आपला पहिला सामना वानखेडे स्टेडियमवर यूएईविरुद्ध खेळणार असून अंतिम सामना ८ मार्च २०२६ रोजी होणार आहे. भारताचा समावेश गट 'अ' मध्ये असून या गटात पाकिस्तान, अमेरिका, नामिबिया आणि नेदरलँड्स हे संघ आहेत.

**भारतीय संघ (टी-२० विश्वचषक व न्यूझीलंड मालिका) :**
सूर्यकुमार यादव (कर्णधार), अक्षर पटेल (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, संजू सॅमसन, ईशान किशन, हार्दिक पांड्या, रिंकू सिंह, शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती, हर्षित राणा, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग.

# लोकशाही सशक्त राहिली तरच स्त्रीमुक्ती शक्य- ॲड. इंदिरा जयसिंग

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

स्त्रीमुक्ती चळवळीला ५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या सुवर्णमहोत्सवी तीन दिवसीय (२०, २१ व २२ डिसेंबर) राज्यस्तरीय परिषदेची सुरुवात मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे झाली. परिषदेचे उद्घाटन खा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुण्या म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. इंदिरा जयसिंग, डॉ. सईदा हमीद तसेच महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या अध्यक्ष शारदा साठे उपस्थित होत्या. मंचावर डॉ. छाया दातार, डॉ. प्रज्ञा दया पवार, ॲड. निशा शिवूरकर, डॉ. चयनिका शहा, लता भिसे-सोनावणे, हसीना खान, अमोल केरकर, सुनीता बागल, शुभदा देशमुख, संगीता जोशी आदी मान्यवर उपस्थित होत्या. अहिल्यानगरहून संध्या मेढे आणि सहकारी सहभागी झाल्या होत्या. स्त्रीमुक्ती चळवळीच्या परंपरेनुसार स्त्रीमुक्ती गीतांच्या सादरीकरणाने परिषदेची सुरुवात झाली. राज्यातील ३१ जिल्ह्यांतून ८०० हून अधिक विविध जाती, धर्म, पंथांतील महिला प्रतिनिधी आणि ट्रान्सजेंडर यांनी परिषदेला उपस्थिती लावली. सुमारे ९२ स्त्रीमुक्ती संघटनांचा सक्रिय सहभाग लाभला. गेल्या वर्षभरात परिषदेमार्फत राज्यभर विभागनिहाय महिलांच्या समस्या समजून घेऊन त्यावर केलेल्या कार्याचा आढावा सादर करण्यात आला. यासह अलीकडेच करण्यात आलेल्या सेफ्टी ऑडिट अहवालाची माहिती देत महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भातील वास्तव आणि आव्हाने स्पष्ट करण्यात आली. यावेळी बोलताना ॲड. इंदिरा जयसिंग म्हणाल्या, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर



### महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषद मुंबईत सुरू

यांनी खऱ्या अर्थाने देशात स्त्रीमुक्तीची मुहूर्तमेढ रोवली. गांधीजींनी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची शिकवण दिली, तर डॉ. आंबेडकरांनी मूलभूत अधिकारांसाठी संघर्ष करायला शिकवले. संविधानाचे जनक कोण, हा प्रश्न नेहमी विचारला जातो; मात्र संविधानाची 'आई' कोण, हा प्रश्न विचारला जात नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. मृणालताई गोरे आणि अहिल्याबाई रांगणेकर यांनी पाण्यासारख्या मूलभूत हक्कासाठी लाटणे मोर्चे काढले, प्रमिला दंडवते यांनी हुंडाविरोधी चळवळ गावोगावी पोहोचवली, निरा देसाई यांनी शैक्षणिक परंपरेचा पुरस्कार केला, तर निर्मला देशपांडे यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर महिलांच्या समस्या सार्वत्रिक असल्याची जाणीव करून दिली, असे त्यांनी नमूद केले. पंचायतराज व्यवस्थेत महिलांना अधिकार मिळाल्याचे सांगितले जाते; मात्र प्रत्यक्षात सत्ता अनेकदा 'सरपंच पतीं'कडेच केंद्रीत राहते. त्यामुळे स्त्रीमुक्ती ही लोकशाहीवर अवलंबून असून, लोकशाही सशक्त राहिली तरच खऱ्या अर्थाने स्त्रीमुक्ती शक्य होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. सन्माननीय पाहुण्या डॉ. सईदा हमीद यांनी महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या कार्याचे कौतुक करताना, प्लॅनिंग कमिशनमध्ये काम करताना मालेगाव आणि गडचिरोली येथील परिस्थितीचा अभ्यास करून वस्तुस्थिती देशासमोर मांडल्याचा अनुभव सांगितला आणि स्त्रीमुक्तीसाठी शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहण्याची ग्वाही दिली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत करताना खासदार सुप्रिया सुळे यांनी पाच दशकांच्या स्त्रीमुक्ती चळवळीचा आढावा घेतला. आजही हुंड्यामुळे महिलांना आत्महत्येचा मार्ग स्वीकारावा लागतो, मेट्रोसारख्या सुविधा आल्या तरी प्रवास सुरक्षित नाही, तसेच घर व शाळांमध्ये स्त्रीला सन्मानाची वागणूक मिळत नाही, असे त्यांनी सांगितले. केंद्र सरकारने नुकताच नरेगा संदर्भातील ठराव लोकसभेत मंजूर केल्यामुळे रोजगार हमी योजनेवर होणारे परिणाम चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले, तसेच आगामी अणुकरारांमुळे निर्माण होणाऱ्या गंभीर परिणामांवर आतापासूनच विचार करण्याची गरज व्यक्त केली. अध्यक्ष शारदा साठे यांच्या हस्ते मान्यवरांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला आणि परिषदेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## अन्वयार्थ पाथर्डी नगरपरिषदेच्या निकालाचा



**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

**जनसंपर्कातील कमालीचं सातत्य, समाजाच्या प्रत्येक छोट्या छोट्या घटकांना शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यात केलेली मदत, शैक्षणिक उपक्रमांतून विद्यार्थ्यांशी व पालकांशी होणारा थेट संपर्क, अजातशत्रू व्यक्तिमत्व, प्रत्येक समाजाच्या उत्सवात केली जाणारी आर्थिक मदत, प्रत्येक जातीधर्मांतील घटकांना दिला जात असलेला सन्मान या अभय आव्हाड यांच्या जमेच्या बाजू असताना त्यांच्याशी भिडताना वेगळ्या रणनितीची गरज होती. परंतु, बंडू पाटील बोरुडे यांनी गेल्या टर्ममधील भ्रष्टाचारावर फोकस केला. परिणामी तो फलद्रूप झाला नाही आणि त्याची मोठी किंमत त्यांना चुकवावी लागली.**

पाथर्डी नगरपरिषदेच्या निवडणुकीचा निकाल धक्कादायक असला तरी अपेक्षीतही नव्हता. सुरुवातीपासून शेवटपर्यंत चुरशीची वाटणारी ही लढत इतकी एकतर्फी होईल, असं कुणालाही वाटलं नव्हतं. तरीही, भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अभय आव्हाड यांनी तब्बल १०७७२ मतं मिळवत ५८४० इतक्या मताधिक्याने दणदणीत विजय मिळवला. त्यांचे मुख्य प्रतिस्पर्धी, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बंडू पाटील बोरुडे यांना केवळ ४९३२ मतांवर समाधान मानावं लागलं. नगरसेवक पदाच्या एकूण २० उमेदवारांपैकी भाजपाचे १४, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ५ तर दीपाली बंग यांच्या रुपाने एक अपक्ष उमेदवार निवडून आला.

पाथर्डी नगरपरिषदेची निवडणूक जाहीर झाली तेव्हापासूनच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बंडू पाटील बोरुडे यांनी प्रचारात आघाडी घेतली होती. भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अभय आव्हाड यांची उमेदवारी उशीरा घोषित झाली असली तरी त्यांनीही उमेदवारी गृहीत धरून प्रचाराला सुरुवात केली होती. विखे पाटील समर्थक म्हणून अभय आव्हाड यांची ओळख असल्याने, त्यांच्या उमेदवारीबद्दल साशंकता होती. परंतु, आव्हाडांखेरीज अन्य कुणीही तुल्यबळ उमेदवार दृष्टीपथात नसल्याने अखेर आमदार मोनिका राजळे यांचा नाइलाज झाला. यंदाची, नगर परिषदेची निवडणूक लागल्यापासून जातीवादाची चर्चा सुरू झाली. अशातच, मराठा समाजानंतर संख्येने दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या कोष्टी समाजाचे संजय भागवत यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाने उमेदवारी जाहीर केली. भाजपाची पाठराखण करणारा समाज म्हणून कोष्टी समाजाकडे पाहिले जात असल्याने, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विजयाच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. परंतु, संजय भागवत यांनी ऐनवेळी माघार घेतल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटावर सेनापतीशिवाय लढण्याची नामुष्की ओढवली आणि भाजपाच्या विजयाचा मार्ग सुकर झाला.

संजय भागवत यांनी माघार घेतल्यामुळे, ऐनवेळी ही निवडणूक दुरंगी झाल्याने या निवडणुकीची समीकरणे झपाट्याने बदलली. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते, ॲड. प्रताप ढाकणे यांनी मुत्सद्देगिरीचे प्रदर्शन करत कोष्टी समाजासाठी उपनगराध्यक्ष पदाची घोषणा केली असली तरी ती फलद्रूप झाली नाही. या पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बंडू पाटील बोरुडे यांनी सुरुवातीपासूनच भाजपाच्या भ्रष्टाचाराचे वाभाडे काढण्यास सुरुवात केली. परंतु, हे करत असताना त्यांनी हे लक्षात घेतलं नाही की, भाजपाचे माजी नगराध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे हे त्यांचे प्रतिस्पर्धी नाहीत. त्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून अभय आव्हाड हे रिंगणात असूनही त्यांनी भ्रष्टाचारावर फोकस केला. वास्तविक पाहता त्यांनी अभय आव्हाड यांच्या जमेच्या बाजू लक्षात घ्यायला हव्या होत्या. त्यांना शह देण्यासाठी वेगळी रणनिती आखायला हवी होती. हे ना त्यांच्या लक्षात आले ना त्यांचे नेते ॲड. प्रताप ढाकणे यांच्या लक्षात आले. त्यामुळे सुरुवातीपासून शेवटपर्यंत त्यांचा प्रचार दिशाहीन ठरत गेला आणि त्याची किंमत त्यांना मोजावी लागली. अशातच, त्यांना अपेक्षित असलेली व त्यांनी गृहीत धरलेल्या विशिष्ट समाजाची मतेही त्यांना मिळाती नाहीत. परिणामी अभय आव्हाड यांनी मोठा विजय मिळवला.

## कोपरगावात पराग संधान यांचा ४०९ मतांनी दणदणीत विजय

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव नगराध्यक्ष निवडणुकीत अत्यंत चुरशीच्या व प्रतिष्ठेच्या लढतीनंतर भारतीय जनता पार्टीचे उमेदवार पराग शिवाजी संधान यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट)चे उमेदवार ओमप्रकाश (काका) कोयटे यांचा ४०९ मतांनी पराभव करत नगराध्यक्षपदावर विजय मिळवला. हा निकाल केवळ नगराध्यक्ष पदापुरता मर्यादित न राहता स्थानिक तसेच राज्यस्तरीय राजकारणावर परिणाम करणारा ठरला आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेदरम्यान राजकीय समीकरणांमध्ये सतत बदल होत राहिले. मतमोजणीच्या प्रत्येक फेरीत आघाडीचे चित्र बदलत असल्याने निकाल शेवटच्या क्षणापर्यंत अनिश्चित राहिला. काही टप्प्यांवर विजय प्रतिस्पर्ध्याच्या बाजूने झुकत असल्याचे संकेत मिळाले; मात्र निर्णायक क्षणी आवश्यक मते मिळवत पराग संधान यांनी बाजी मारली. या विजयामागे भाजपची संघटनात्मक ताकद, नगरसेवकांचे पाठबळ तसेच शेवटच्या टप्प्यात साधलेली राजकीय जुळवाजुळव निर्णायक ठरल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. निकाल जाहीर होताच भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून व जल्लोष करत आनंद व्यक्त केला. या निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्यात थेट प्रतिष्ठेची लढाई पाहायला मिळाली. भाजपकडून देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जाहीर सभांमधून विकास, स्थिर प्रशासन आणि केंद्रराज्य समन्वयाचे मुद्दे प्रभावीपणे मांडण्यात आले. याचा शहरी मतदारांवर सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून आले. दुसरीकडे राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून अजित पवार यांनी प्रचारात थेट सहभाग घेत पारंपरिक मतपेढी व स्थानिक मुद्द्यांवर भर दिला. मात्र प्रचारादरम्यान



आरोपप्रत्यारोप वाढल्याने त्याचा काही प्रमाणात उलटा परिणाम झाल्याची चर्चा आहे. या निवडणुकीत अपक्ष नगरसेवकांची भूमिका, अंतर्गत नाराजी आणि शेवटच्या क्षणी झालेली राजकीय जुळवाजुळव हे घटक निकालासाठी महत्त्वाचे ठरले. भाजपने एकसंघ मतदानावर भर दिला, तर राष्ट्रवादीकडे मतविभाजन झाल्याचे चित्र समोर आले. या निकालामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपची पकड अधिक मजबूत झाल्याचे संकेत मिळाले असून आगामी निवडणुकांच्या दृष्टीने हा विजय भाजपसाठी मनोबल वाढवणारा ठरला आहे. तर राष्ट्रवादी कॉंग्रेससाठी आत्मपरीक्षणाची गरज निर्माण झाली आहे. दरम्यान, विजयी नगराध्यक्ष पराग संधान यांच्यासमोर शहर विकासाच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

**नगराध्यक्षपदाचे उमेदवार व मते**
पराग शिवाजी संधान (भाजप) १८,५०३ (विजयी), ओमप्रकाश (काका) कोयटे (राष्ट्रवादी अजित पवार) १८,०९४, राजेंद्र मुरलीधर झावरे (शिवसेना शिंदे) ३,४९६, सपना भरत मोरे (शिवसेना उबाठा) २,१७६, विजय सूर्यभान वहाडणे (अपक्ष) ५९१, नोटा ३८६, नगरसेवक निकाल (एकूण ३० जागा): भाजप १९, राष्ट्रवादी ११ जागांवर विजय.

## वधू-वर मेळावे व सामुदायिक विवाह सोहळे हे पुण्याचे कार्य- आ. मुळे

### राजमाता जिजाऊ सांस्कृतिक प्रतिष्ठान आयोजित वधू-वर मेळाव्यास उदंड प्रतिसाद

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

बदलत्या काळात जीवनशैलीत मोठे बदल झाले असून शिक्षणाबरोबरच मुला-मुलींच्या भावी आयुष्याबाबतच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. यामुळे वेळेवर लग्न जुळविणे ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली. अशा परिस्थितीत वधू-वर मेळावे आणि सामुदायिक विवाह सोहळे हे पवित्र आणि पुण्याचे कार्य असल्याचे प्रतिपादन कर्नाटक राज्य मराठा विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष व विधान परिषद सदस्य मारुतीराव मुळे यांनी केले. रविवारी धारवाड रोड येथील रूपाली कन्व्हेन्शन हॉलमध्ये राजमाता जिजाऊ सांस्कृतिक प्रतिष्ठान यांच्या वतीने मराठा समाज वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास आम. मारुतीराव मुळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी त्यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ



यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वधू-वर मेळाव्याच्या मुख्य आयोजक डॉ. सोनाली सरनोबत यांनी मुळे यांचा सत्कार केला. यावेळी बोलताना मुळे म्हणाले की, प्रत्येकाच्या आयुष्यात वधू-वर निवड हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. काळानुसार जीवनशैलीत बदल झाले असून मुला-मुलींनी उच्च शिक्षणाच्या जोरावर भावी आयुष्याची स्वप्ने पाहिली आहेत. त्यामुळे अपेक्षा वाढल्या असून लग्न जुळविताना पालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मुला-मुलींची वेळेत लग्ने लावणे हा समाजासमोरील गंभीर प्रश्न बनला आहे. अशा वेळी वधू-वर मेळावे आणि सामुदायिक विवाह सोहळे समाजासाठी पवित्र व उपयुक्त ठरत आहेत. अशा उपक्रमांमुळे समाज एकत्र येतो, जागरूकता वाढते आणि चिंतन-मंथन घडते. डॉ. सोनाली सरनोबत यांनी राजमाता जिजाऊ सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून सुरू ठेवलेले कार्य कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रास्ताविकात डॉ. सोनाली सरनोबत म्हणाल्या की, वधू-वर मेळावा हा समाजाच्या हिताचा उपक्रम असून या माध्यमातून विखुरलेल्या समाजाला एकत्र आणण्याचे कार्य केले जात आहे. मुला-मुलींच्या वाढलेल्या अपेक्षांमुळे पालक व तरुणांमध्ये निर्माण होणारी घुसमट ही चिंतेची बाब आहे. या पार्श्वभूमीवरच राजमाता जिजाऊ सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने असे मेळावे आयोजित केले जात आहेत. नियती फाउंडेशनच्या माध्यमातून यापूर्वी महिला व विद्यार्थ्यांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले असून भविष्यात सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्याला कर्नाटक राज्य क्षत्रिय मराठा परिषदेचे पाठबळ मिळत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आजच्या वधू-वर मेळाव्यास मराठा समाजातील तब्बल ४०० हून अधिक इच्छुक वधू-वरांनी नोंदणी केली होती. यावेळी पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

# करण ससाणे यांचा दणदणीत विजय

## शांतता, सलोखा आणि विकासाच्या बाजूने श्रीरामपूरकरांचा कौल




### वॉर्ड २ पुन्हा एकदा निर्णायक

**मुस्लिम बहुल बाग असलेल्या वॉर्ड क्रमांक दोनमधील मतदारांनी यावेळीही निर्णायक भूमिका बजावली. लोकसभा निवडणुकीत भाऊसाहेब वाकचौरे आणि विधानसभा निवडणुकीत हेमंत ओगले यांना दिलेल्या मताधिक्याची परंपरा नगरपालिका निवडणुकीतही कायम राहिली. या परिसरातील चार प्रभागांतून करण ससाणे यांना सुमारे दहा हजार मतांची आघाडी मिळाली. एकट्या प्रभाग सहामधून २,२४० तर प्रभाग आठमधून ३,१०६ मते मिळाली. नगरपालिका, विधानसभा वा लोकसभाश्रीरामपूरमध्ये वॉर्ड क्रमांक दोनचे मतदान नेहमीच निर्णायक ठरते, याची प्रचिती पुन्हा एकदा आली.**

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

तब्बल वीस दिवसांच्या प्रतीक्षेनंतर काल मतमोजणीद्वारे जाहीर झालेल्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत करण जयंत ससाणे यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने उमेदवारी करत भारतीय जनता पार्टीचे उमेदवार श्रीनिवास बिहाणी यांचा ६,७६७ मतांनी पराभव करून दणदणीत विजय मिळवला.

नऊ वर्षांपूर्वी काँग्रेसच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार राजश्री ससाणे यांच्या पराभवाची परतफेड यानिमित्ताने झाल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. शांतता, सलोखा आणि विकासासाठी स्वाभिमानी श्रीरामपूरकरांनी ससाणे यांना भरघोस मतांनी निवडून दिले, अशी चर्चा आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा प्रभाव श्रीरामपूरमध्ये दिसून आला नाही. राज्यात काँग्रेस पक्षाला फटका बसलेला असतानाही विधानसभा व नगरपालिका निवडणुकीत श्रीरामपूरकरांनी काँग्रेसची पाठराखण केली, हे विशेष ठरले. नगरसेवक पदाच्या निवडणुकीत काँग्रेसचे २०, भाजपाचे १०, शिवसेना (शिंदे गट)चे ३ तर एक अपक्ष उमेदवार विजयी झाला. मतमोजणी काल सकाळी ९.३० च्या सुमारास प्रांत कार्यालयात सुरू झाली. १० वाजता मतपेट्या उघडण्यात आल्या आणि हळूहळू निकाल येऊ लागले. सुरुवातीला सर्वच पक्षांच्या उमेदवारांची व प्रतिनिधींची मोठी गर्दी होती; मात्र तिसऱ्या फेरीनंतर पराभूत उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी निघून गेले. ११.३० च्या सुमारास एकूण निकालाचा कल स्पष्ट होताच मतमोजणी केंद्राबाहेर विजयी कार्यकर्त्यांनी जल्लोष सुरू केला.

दुपारी दोन वाजता अंतिम आकडेवारी जाहीर करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांत अधिकारी किरण सावंत पाटील यांनी विजयी उमेदवारांना प्रमाणपत्रे प्रदान केली. सर्वप्रथम नगराध्यक्षपदी विजयी झालेले करण ससाणे यांना प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी आमदार हेमंत ओगले, माजी नगराध्यक्षा राजश्री ससाणे, सचिन गुजर, अंजुमभाई शेख, सुधीर नवले, मुजफ्फर शेख, दिलीप सानप आदी उपस्थित होते. त्यानंतर प्रभागनिहाय प्रमाणपत्र वितरण झाले. काँग्रेस पक्षाचे विजयी उमेदवार: करण ससाणे (नगराध्यक्ष), दीपक वमने, सोनिया बिट्टू कक्कड, प्रणिती चव्हाण, कांचन सानप, नागेश्वरी एडके, दिलीप नागरे, नवनीत कौर सेठी, जकिया सादिक शेख, मुजफ्फर शेख, राजेंद्र पवार, शाहेला शाह, श्याम आढागळे, यास्मिन जावेद शेख, जाहिदाबी कुरेशी, रईस जहागीरदार, निलोफर शेख, वैशाली पोटे, आशा संतोष परदेशी, योगिता नागले, योगेश जाधव. भाजपाचे विजयी उमेदवार: सिद्धार्थ संजय फंड, संदेश गांगड, आशिष धनवटे, जयश्री रवी पाटील, वैशाली चव्हाण, दीपक चव्हाण, आशा शशांक रासकर, जितेंद्र छाजेड, स्नेहल केतन खोरे, मनोज लबडे. शिवसेना (शिंदे गट)चे विजयी उमेदवार: मंजुश्री मुरकुटे, आकाश बेग, संतोष कांबळे. अपक्ष विजयी उमेदवार: अर्जुन दाभाडे. नगराध्यक्ष पदासाठी शिवसेना (शिंदे गट)चे उमेदवार प्रकाश चित्ते यांना ८,०८६ मते मिळाली असून ते तिसऱ्या क्रमांकावर राहिले. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे एकेकाळी नगराध्यक्षपद भूषविणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनुराधाताई आदिक यांचा प्रभाग क्रमांक तीनमधून ४२० मतांनी पराभव झाला; राष्ट्रवादी काँग्रेसचा एकही नगरसेवक निवडून आला नाही. काही प्रभागांमध्ये चुरशीची तर काही ठिकाणी एकतर्फी लढत पाहायला मिळाली. विजयानंतर बोलताना नूतन नगराध्यक्ष करण ससाणे यांनी शांतता व विकासाला मतदारांनी साथ दिल्याचे सांगून माजी आमदार जयंत ससाणे यांच्या आदर्शांनुसार काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. आमदार हेमंत ओगले यांनी काँग्रेसवर विश्वास दाखवल्याबद्दल मतदारांचे आभार मानले. निकालानंतर सर्व प्रभागांत विजयी उमेदवारांच्या मिरवणुका गुलालाची उधळण करत काढण्यात आल्या.




# शिक्षकांच्या पगारासाठी माजी विद्यार्थ्यांचा हातभार

## श्रीराम विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा अनोखा निर्णय

**नगर तालुका । रयत समाचार**

पिंपळगाव माळवी येथील श्रीराम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे शनिवार, ता. २० डिसेंबर रोजी माजी विद्यार्थ्यांचा भव्य मेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेबद्दलची निष्ठा व जबाबदारी दाखवत एक अनोखा व प्रेरणादायी निर्णय घेतला. विद्यालयात सध्या शिक्षकांची पाच पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी मानधन तत्त्वावर शिक्षकांची नेमणूक करून त्यांच्या पगाराची जबाबदारी माजी विद्यार्थ्यांनी स्वीकारण्याचा ठराव यावेळी करण्यात आला. या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मेजर विश्वनाथ गुंड होते. यावेळी विद्यालयाचे माजी विद्यार्थी व माजी सरपंच सुभाष झिने, वडगाव गुप्ताचे सरपंच विजय शेवाळे तसेच अजित बोरा यांनी प्रत्येकी एका शिक्षकाचा पगार देण्याची जबाबदारी स्वीकारल्याची जाहीर घोषणा केली. मेळाव्यास विद्यालयाचे माजी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य संभाजी पवार यांनी प्रास्ताविक करत विद्यालयाच्या भौतिक व शैक्षणिक गरजांची माहिती दिली. ऑनररी कॅप्टन हरीराम शिंदे यांनी माजी सैनिक संघटनेच्या वतीने विद्यालयास भरीव मदत करण्याचे आश्वासन दिले. माजी विद्यार्थी प्राचार्य शिवाजी गायकवाड, नंदा शिंदे, प्रशांत खंडागळे, दत्तात्रय भोंदे, सरपंच विजय शेवाळे तसेच ग्रामपंचायत सदस्य सागर गुड यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास मांजरसुंबा येथील सरपंच जालिंदर कदम, हभप कृष्णा रायकर, ग्रामपंचायत सदस्य बापू बेरड, संस्थेचे योगेश झिने, सावन रायकर, चेअरमन बबन झिने यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थी अजित बोरा यांनी, ''विद्यालयाचे व गावाचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आणि शाळेच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी हा छोटासा हातभार आहे,'' अशी भावना व्यक्त केली. तर पर्यवेक्षक रामराव साबळे यांनी, ''या मेळाव्यातून मिळालेल्या भरीव मदतीमुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास निश्चितच मदत होईल,'' असे मत व्यक्त केले.

# राष्ट्रवादी ख्रिश्चन सेल राज्य प्रमुखपदी बाळासाहेब साळवे

**अहमदनगर । समीर मन्यार**

येथील बाळासाहेब शंकर साळवे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) च्या ख्रिश्चन सेलच्या राज्य प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या मान्यतेने मुंबई येथील प्रदेश कार्यालयात बाळासाहेब साळवे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.



या प्रसंगी खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, आमदार बापूसाहेब पठारे आदी उपस्थित होते. साळवे यांनी आतापर्यंत केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन ही नियुक्ती करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

नियुक्तीनंतर बोलताना बाळासाहेब साळवे म्हणाले, महाराष्ट्रात पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक भक्कम करण्यासाठी आपण सर्वशक्तीनिशी योगदान देऊ. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन पक्षाची ध्येय-धोरणे तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांचे विचार तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि सामाजिक कार्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# मतमोजणी केंद्रातील उत्साह आणि गोड शेवट

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

नगरपालिका निवडणुकीची मतमोजणी काल मध्यवर्ती इमारतीत उभारलेल्या मंडपात सकाळी सुरू झाली. सुरुवातीपासूनच मतमोजणी केंद्रावर उत्साहाचे वातावरण होते. सर्वच पक्षांचे उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी निवडून येण्याच्या आशेने येथे उपस्थित होते. त्यामुळे प्रत्येकजण प्रफुल्लित चेहऱ्याने वावरताना दिसत होता. निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांत अधिकारी किरण सावंत पाटील मतमोजणी केंद्रावर उपस्थित होते. त्यांच्या मदतीला सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार मिलिंदकुमार वाघ आणि दुसरे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व नगरपालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप हे सर्व सहकाऱ्यांसह हसतमुखाने कामकाज पार पाडत होते. महसूल विभाग व नगरपालिकेच्या अधिकारी-




कर्मचाऱ्यांना मतमोजणीचे प्रशिक्षण देण्यात आलेले असल्याने सर्व प्रक्रिया शिस्तबद्ध व नियमानुसार सुरू होती. उमेदवारांच्या प्रतिनिधींसाठी जाळीच्या बाहेर बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती, तर पत्रकारांसाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला होता. जशी-जशी मतमोजणी पुढे सरकत होती, तशी मतमोजणी कक्षातील गर्दी कमी होत गेली. पराभूत उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी हळूहळू निघून गेले, तर दुसरीकडे मतमोजणी केंद्राबाहेर विजयी उमेदवारांचा जल्लोष सुरू झाला. प्रत्येक टेबलवरील मतमोजणी काटेकोरपणे करून आकडेवारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर केली जात होती. प्रत्येक प्रभागातील आकडे तीन वेळा तपासून अंतिम करण्यात येत होते. निवडणूक यंत्रणेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी तळमळीने व जबाबदारीने काम केल्यामुळे कोणतीही गडबड न होता मतमोजणी सुरळीत पार पडली. मतमोजणीच्या शेवटी आमदार हेमंत ओगले यांनी संपूर्ण यंत्रणेचे आभार मानले. श्रीरामपूर मराठी पत्रकार संघातर्फे प्रांत अधिकारी किरण सावंत पाटील, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप तसेच संपूर्ण यंत्रणेचे आभार मानण्यात आले. विशेष म्हणजे काल तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांचा लग्नाचा वाढदिवस तर मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांचा वाढदिवस होता. त्यामुळे मराठी पत्रकार संघातर्फे पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थापक अध्यक्ष प्रदीप आहेर, अध्यक्ष महेश रक्ताटे, उपाध्यक्ष सलीमखान पठाण, सचिव सचिन उघडे, सदस्य रमेशभाऊ कोठारी व नितीन चित्ते उपस्थित होते. सकाळी सातपासून सुरू असलेले कामकाज दुपारी पावणे तीनला आटोपले. यशस्वी मतमोजणीनंतर आता हीच यंत्रणा जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या तयारीला लागली आहे.


दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक
गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे

ख्रिसमस विशेषांक

अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात

अतिथी संपादक
सॅम्युअल वाघमारे
8788412780

संपादक
भैरवनाथ वाकळे
8805401800

रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक

जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक
भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का?
CASH COUNTER
अधिक माहितीसाठी संपर्क
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# काँग्रेसचा श्रीरामपूरला स्ट्राइक, भाजपाची घोडदौड

## शिंदेसेनेला पसंती, राष्ट्रवादी नामशेष




**श्रीरामपूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर नगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेसचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष करण ससाणे यांचा स्ट्राइक तर पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या भाजपाने १० ठिकाणी आपली घोडदौड सुरू ठेवली आहे. पालिकेच्या निवडणुकीत नव्यानेच उतरलेल्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ३ जागा जिंकत खाते उघडले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला मात्र एकही जागा जिंकता आली नाही. लोकनियुक्त माजी नगराध्यक्ष अनुराधा आदिक यांना नगरसेवक पदाच्या निवडणुकीत पराभवाचा मोठा धक्का बसला. प्रदीर्घ कालखंडानंतर अर्जुन दाभाडे या अपक्ष उमेदवाराने विजय मिळवत पालिकेत आपले खाते उघडले. या निवडणुकीचे खास वैशिष्ठ्य म्हणजे रवींद्र गुलाटी, राजेश अलघ, संजय छल्लारे या दिग्गजांचा झालेला पराभव म्हणावा लागेल. या उमेदवारांनी पक्षांतर केले आणि त्यांना दारून पराभवाला सामोरे जावे लागले. या तिघाही उमेदवारांचे काम उल्लेखनीय जरी असले तरी मतदारांनी नाकारल्यामुळे त्यांच्या कामावर पाणी फेरले गेले. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार श्रीनिवास बिहानी, प्रकाश चित्ते यांनी देखील अपेक्षेप्रमाणे मते घेतली. मात्र त्यांना विजयापर्यंत पोहोचता आले नाही. करण ससाणे यांनी सर्वात अगोदर स्वतःची उमेदवारी घोषित करत त्याचबरोबर संपूर्ण पॅनल उभा करून प्रचारही सुरू केला. प्रचाराची एक फेरी पूर्ण झाली तरी विरोधातील पालकमंत्री राधाकृष्ण विखे, डॉ. सुजय विखे, अविनाश आदिक, अनुराधा आदिक, एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांच्याकडून नगराध्यक्ष पदाचा उमेदवार अखेर पर्यंत घोषित झाला नाही.

**स्व. ससाणे, कांबळे यांची आठवण**

**गेल्या ९ वर्षापूर्वी श्रीरामपूर नगरपालिकेच्या झालेल्या निवडणुकीत स्व. जयंत ससाणे व अनिल कांबळे या जोड गोळीने मोठ्या हिरीरीने भाग घेतला होता. या दोघांचीही राजकारणात घट्ट मैत्री होती. या निवडणुकीत दोघांचीही केवळ आठवण उरल्याची मतदारांमध्ये चर्चा होती.**

निवडणुकी अगोदर काही तास भाजपाचे श्रीनिवास बिहानी यांच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीसह भाजप राष्ट्रवादीची प्रभागातील उमेदवारांची यादी जाहीर झाली. उपमुख्यमंत्री अजित पवार गटाचे अविनाश आदिक आणि अनुराधा आदिक यांच्या उमेदवारांना मुस्लिम बहुल भागातील प्रभागात उमेदवारी देण्यात आली. मात्र त्यास खूप मोठा उशीर झाला होता. विखे आदिक यांच्यात नगराध्यक्ष पदासंदर्भातील उमेदवारी बाबत अखेरपर्यंत चर्चा रेंगाळल्याने निवडणुकीत मोठी हानी झाली.

एकनाथ शिंदे शिवसेनेतही यापेक्षा दुसरी परिस्थिती नव्हती. मात्र प्रकाश चित्ते यांनी मंत्री शिंदे यांच्याकडून उमेदवारी मिळणार असल्याच्या शक्यतेने स्वतः प्रचार सुरू केला.

**चव्हाण दांपत्य दुसऱ्यांदा**

**भाजपाचे दीपक चव्हाण आणि त्यांच्या पत्नी वैशाली चव्हाण हे पुन्हा एकदा दुसऱ्यांदा मोठ्या मताधिक्याने निवडून आले आहेत. शहरात हा चर्चेचा विषय झाला.**

चित्ते यांनी शहरात मोठी हवा ही तयार केली. माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, भानुदास मुरकुटे, सागर बेग यांचाही पाठिंबा मिळवत शक्ती प्रदर्शन केले. मात्र मतपेटीत त्याचे रूपांतर होऊ शकले नाही. पालकमंत्री विखे यांनी भाजपा कडून श्रीनिवास बिहानी यांना मैदानात उतरवले. बिहानी हे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारी संदर्भात स्वतःची नगराध्यक्ष ही क्रेझ निर्माण करू शकले नाही. भाजपात नव्याने दाखल झालेल्या काही नेत्यांनी अनुराधा आदिक यांच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीला खोडा घातला आणि या निवडणुकीची मजा येथे थांबली. विखे - आदिक यांच्याकडून नगराध्यक्ष पदाचा उमेदवार तसेच इतरही प्रभाग वाईज उमेदवारांची घोषणा होईपर्यंत अनेक निष्ठावंत आदिक यांच्यापासून दुसऱ्या पक्षात गेले होते. याचाही मोठा फटका विखे आदिक यांना येथे बसला. विरोधकांमध्ये सुन्दोपसुंदी सुरू झाल्याने काँग्रेसचे करण ससाणे यांना

**अपक्षाची मुसंडी**

**अपक्ष अर्जुन दाभाडे हे या निवडणुकीत एकमेव अपक्ष म्हणून निवडून आले. राजेश अलघ या मातब्बर उमेदवाराचा त्यांनी पराभव केला. १९९६ ला कांबळे नामक एक उमेदवार अपक्ष म्हणून निवडून आले होते. त्यानंतर तब्बल २९ वर्षांनी प्रदीर्घ काळानंतर श्रीरामपूर नगरपालिकेत दाभाडे अपक्ष निवडून आले आहेत.**

त्यांचा सर्वाधिक फायदा झाला. ससाणे यांनी आपल्या टीमला बरोबर घेत शांतीच्या मार्गाने आपला प्रचार सुरू ठेवला. ''आरे ला कारे'' न करता श्रीरामपूर शहराला आता भयमुक्तीची गरज असल्याचे त्यांनी या प्रचारातून दाखवून दिले मतदारांना ते पटलेही आणि मतदारांनी त्यांच्या झोळीत भरभरून दानही दिले. काँग्रेसच्या करन ससाने यांनी श्रीरामपूरला स्ट्राइक दिला. भाजपाने दहा जागा जिंकून आपली घोडदौड सुरू ठेवली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सेनेला ही मतदारांनी पसंती देत तीन जागा बहाल केल्या. अपक्षाने देखील खाते उघडले. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला येथे एकही जागा मिळाली नाही, यापेक्षा दुर्दैव दुसरे कोणतेच राष्ट्रवादीच्या वाट्याला आले नाही.

## भाजपाचा गड कायम; प्रांजल चिंतामणी नगराध्यक्षपदी

**जामखेड । रिजवान शेख**

जामखेड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत माजी मंत्री प्रा. राम शिंदे तसेच आमदार रोहित पवार यांनी आपली राजकीय प्रतिष्ठा पणाला लावली होती. अत्यंत चुरशीची व प्रतिष्ठेची ठरलेली ही लढत अखेर भारतीय जनता पार्टीने जिंकत जामखेडचा गड कायम राखला. नगराध्यक्ष पदासाठी भाजपाच्या उमेदवार प्रांजल अमित चिंतामणी यांनी तब्बल साडेतीन हजारांहून अधिक मतांनी दणदणीत विजय मिळवला. या निकालामुळे भाजपाला मोठे राजकीय बळ मिळाले असून जामखेड शहराच्या राजकारणात पक्षाचे वर्चस्व अधिक भक्कम झाले आहे. नगरपरिषद निवडणुकीत एकूण २५ नगरसेवकांपैकी भाजपाने १५ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) ला ५ जागा मिळाल्या, तर वंचित बहुजन आघाडीने २ जागांवर विजय मिळवला. शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांना प्रत्येकी १ जागा मिळाली. प्रभागनिहाय निकालानुसार प्रभाग १ मधून सुमन शेळके व श्रीराम डोके (भाजपा) विजयी झाले. प्रभाग २ मध्ये ॲड. प्रविण सानप (भाजपा) व प्रिती प्रशांत राळेभात (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार) यांनी विजय मिळवला. प्रभाग ३ मध्ये पोपट राळेभात व सीमा रवींद्र कुलकर्णी (भाजपा), प्रभाग ४ मध्ये विकी घायतडक व प्रांजल अमित चिंतामणी (भाजपा) विजयी ठरले. प्रभाग ५ मध्ये हर्षद काळे (भाजपा) व वर्षा कैलास माने (शिवसेना एकनाथ शिंदे) यांचा विजय झाला. प्रभाग ६ मधून डॉ. ॲड. अरुण जाधव व संगिता भालेराव (वंचित बहुजन आघाडी) विजयी झाले. प्रभाग ७ मध्ये नंदा प्रविण होळकर व मोहन पवार (भाजपा), प्रभाग ८ मध्ये हिना सय्यद व राजू गोरे (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार), प्रभाग ९ मध्ये वैशाली अर्जुन म्हेत्रे व तात्याराम पोकळे (भाजपा) विजयी ठरले. प्रभाग १० मधून मेहरुन्निसा कुरेशी व वशिम सय्यद (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार) तर प्रभाग ११ मधून संजय काशिद व आशाबाई टकले (भाजपा) निवडून आले. प्रभाग १२ मध्ये महेश निमोणकर (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार) व जया संतोष गव्हाळे (भाजपा) यांनी विजय मिळवला. या निकालानंतर जामखेड शहरात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. तर विरोधी पक्षांनी आत्मपरीक्षणाची भूमिका घेत पुढील राजकीय वाटचालीसाठी रणनीती आखण्याचे संकेत दिले.



## अल्पसंख्यांकांचे हक्क सुरक्षित ठेवणे म्हणजे लोकशाही मूल्यांचे संरक्षण- डॉ. शेख

**युनायटेड सिटी फाउंडेशनतर्फे अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त व्याख्यान**




**अहमदनगर । आबीद खान**

अल्पसंख्यांक हक्क दिन हा केवळ एका समुदायाचा नसून भारताच्या लोकशाही मूल्यांचा आणि घटनात्मक न्यायाचा उत्सव आहे. भारताची ओळख विविधतेतून निर्माण झालेल्या एकतेमुळे आहे. धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरा यातील भिन्नता ही आपली कमजोरी नसून तीच आपली खरी ताकद आहे. अल्पसंख्यांकांचे हक्क सुरक्षित ठेवणे म्हणजे देशाच्या लोकशाही पायाभूत मूल्यांचे संरक्षण करणे होय, असे प्रतिपादन युनायटेड सिटी फाउंडेशनचे संस्थापक डॉ. इमरान शेख यांनी केले. युनायटेड सिटी फाउंडेशनच्या वतीने अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त सर्जेपुरा येथील रहमत सुलतान हॉल येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य नवेद बिजापुरे, रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर, माजी प्राचार्य सिराज कुरेशी, उबेद शेख, अफजल सय्यद, वहाब सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. इमरान शेख पुढे म्हणाले की, भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा, स्वातंत्र्याचा आणि सन्मानाने जगण्याचा हक्क दिला आहे. अल्पसंख्यांक समाजालाही शिक्षण, रोजगार, धार्मिक स्वातंत्र्य, सांस्कृतिक जतन आणि विकासाच्या समान संधी मिळाव्यात यासाठी संविधानात विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत.

या तरतुदींचा उद्देश कुणाला विशेष लाभ देणे नसून समाजाच्या मुख्य प्रवाहात सर्वांना समान सहभागाची संधी देणे हा आहे. आजही अनेक अल्पसंख्यांक घटक शिक्षण, आरोग्य व रोजगारापासून वंचित असल्याने शासनाच्या योजना व कौशल्य विकास कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. उबेद शेख यांनी शिक्षण संस्थांमध्ये अयोग्य व्यक्ती कार्यरत असल्याने अल्पसंख्यांक संस्थांची अधोगती होत असल्याची टीका केली. अल्पसंख्यांकांच्या खाजगी संस्थांतील शाळांमध्ये शिक्षक भरती जिल्हा परिषदेने 'पवित्र' पोर्टलद्वारे करावी, अशी मागणी युनूसभाई तांबटकर यांनी केली. समविचारी लोकांनी एकत्र येऊन कृतीशील कार्यक्रम राबवले तरच समाजात बदल घडेल, असे वहाब सय्यद म्हणाले. अधिकार मागून मिळत नाहीत, त्यासाठी संघर्ष करावा लागतो, तसेच शिक्षक सुधारल्याशिवाय विद्यार्थी सुधारणार नाहीत, अशी खंत माजी प्राचार्य नवेद बिजापुरे यांनी व्यक्त केली. कार्यक्रमास अल्पसंख्यांक समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन सबील सय्यद यांनी केले तर आभार रेहान सय्यद यांनी मानले.

## श्रीगोंदा नगराध्यक्षपदी सुनिता संतोष खेतमाळीस



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा नगरपरिषदेच्या झालेल्या अटीतटीच्या लढतीत भारतीय जनता पार्टीच्या सुनिता संतोष खेतमाळीस यांनी विद्यमान नगराध्यक्षा शुभांगी मनोहर पोटे यांचा १,०३७ मतांनी पराभव करत नगरपरिषदेवर भाजपचा झेंडा फडकवला.

श्रीगोंदा नगरपरिषदेच्या एकूण २२ जागांपैकी १३ जागांवर विजय मिळवत भाजपने नगरपरिषद आपल्या ताब्यात ठेवण्यात यश मिळवले. मात्र भाजपच्या मातब्बर उमेदवार माजी नगराध्यक्षा छाया गोरे व माजी उपनगराध्यक्ष अशोक खेंडके यांना पराभवाला सामोरे जावे लागले. तर राष्ट्रवादी काँग्रेस व महाविकास आघाडीला एकही जागा जिंकता आली नाही. त्यांच्या उमेदवारांचे अनामत रक्कम जप्त झाली. सुरुवातीला भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व महाविकास आघाडी अशी चौरंगी वाटणारी ही निवडणूक अंतिम टप्प्यात दुरंगी झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले. पहिल्या फेरीपासूनच भाजपने आघाडी घेतल्याने भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून व गुलालाची उधळण करत जल्लोष साजरा केला. २२ जागांपैकी शिवसेनाला ९ जागांवर यश मिळाले.

विजयी उमेदवारांमध्ये नगराध्यक्षपदी सुनिता संतोष खेतमाळीस (भाजप) विजयी ठरल्या. प्रभाग क्रमांक १ मधून पल्लवी पांडुरंग पोटे (शिवसेना) व राजेंद्र खेडकर (भाजप) विजयी झाले. प्रभाग क्रमांक २ मधून सुशिलकुमार शिंदे (शिवसेना) व चांदणी दिलीप खेतमाळीस (भाजप) निवडून आले. प्रभाग क्रमांक ३ मधून एम. डी. शिंदे (भाजप) व अनिता दादा औटी (शिवसेना) विजयी ठरले. प्रभाग क्रमांक ४ मधून अनिल औटी (शिवसेना) व वंदना संग्राम घोडके (भाजप) यांनी विजय मिळवला. प्रभाग क्रमांक ५ मधून अख्तर शेख व दिपाली बोरुडे (दोन्ही शिवसेना) विजयी झाले. प्रभाग क्रमांक ६ मधून सोनाली सागर गोरे व डॉ. अनिल घोडके (भाजप) निवडून आले. प्रभाग क्रमांक ७ मधून अश्विनी प्रवीण काळे व अलका सुनिल अनभुले (भाजप) विजयी ठरले. प्रभाग क्रमांक ८ मधून ऋषिकेश बोरुडे (शिवसेना) व कोमल विकास बोरुडे (भाजप) निवडून आले. प्रभाग क्रमांक ९ मधून मनिषा विठ्ठल आनंदकर व शहाजी तुकाराम खेतमाळीस (भाजप) विजयी झाले. प्रभाग क्रमांक १० मधून प्रशांत गोरे व मिरा शिंदे (भाजप) तर प्रभाग क्रमांक ११ मधून भामाबाई कोथिंबीरे व श्रीकृष्ण धुमाळ (शिवसेना) विजयी ठरले. अखेरच्या निकालात २२ पैकी भाजप १३ तर शिवसेना ९ जागांवर विजयी झाली आहे.

## प्रा. महेश जंगले यांना पीएचडी




**नेवासा । विजय खंडागळे**

मुळा एज्युकेशन सोसायटी संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई येथील रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक प्रा. महेश सिताराम जंगले यांना नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने रसायनशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली. प्रा. जंगले यांनी ''Synthesis, Characterization and Biological Studies of Some Triazole Based Heterocyclic Compounds '' या विषयावर आपला शोधप्रबंध विद्यापीठास सादर केला. या संशोधनासाठी त्यांना शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथील प्राध्यापक डॉ. बी. के. मगरे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. महेश जंगले यांचे रसायनशास्त्र विषयातील संशोधन नामांकित जर्नलमध्ये प्रकाशित झाले असून त्यांच्या शोधनिबंधांना अनेक सायटेशन मिळाली आहेत. ट्रायझोल आधारित हेटेरोसायक्लिक संयुगांवर त्यांनी यशस्वी संशोधन केले असून या संयुगांनी उत्कृष्ट प्रतिजैविक परिणाम दर्शविले आहेत. वाढत्या जंतुसंसर्ग आणि औषध प्रतिकारशक्तीच्या पार्श्वभूमीवर हे संशोधन समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. भविष्यात नवीन व प्रभावी औषधनिर्मितीसाठी हे संशोधन महत्त्वाची भूमिका बजावू शकते. या यशाबद्दल मुळा एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष मा. खासदार यशवंतराव गडाख, माजी मंत्री शंकरराव गडाख, उपाध्यक्ष उदयन गडाख, संस्थेचे सचिव उत्तमराव लोंढे, सहसचिव डॉ. विनायक देशमुख तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोरक्षनाथ कल्हापुरे यांनी प्रा. जंगले यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रवीण गेडाम रुजू

**नेवासा । विजय खंडागळे**

श्री क्षेत्र शनीशिंगणापूर देवस्थानच्या कारभाराचा पदभार स्वीकारून नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रवीण गेडाम यांनी मंगळवारी पदभार स्वीकारत कामास सुरुवात केली. त्यांच्या पहिल्याच दिवशी शनीभक्त व माजी विश्वस्त राजू लांडे यांनी त्यांचे स्वागत केले. पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. गेडाम यांनी देवस्थानच्या सर्व विभागांची बैठक घेऊन कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्याचे स्पष्ट केले. शिस्त, पारदर्शक प्रशासन, भक्तांना अधिक सुविधा, श्री शनिमंदिराची पवित्रता जपणे आदी महत्त्वाच्या मुद्द्यांवर विशेष लक्ष दिले जाणार असल्याचे त्यांनी राजू लांडे यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान सांगितले. यापूर्वी देवस्थानचा कारभार जुन्या विश्वस्त मंडळाकडून जिल्हाधिकारी समितीकडे, त्यानंतर संभाजीनगर खंडपीठाकडून पुन्हा जुन्या विश्वस्त मंडळाकडे असा सुरू होता. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर आता देवस्थानचा संपूर्ण कारभार नाशिक येथील विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्याकडे सोपविण्यात आला. पदभार स्वीकारताच त्यांनी तात्काळ कारभार हाती घेत शनिदर्शनाच्या माध्यमातून व्यवस्थापनाची पाहणी सुरू केली. यावेळी रवींद्र अवताडे, संदीप दरंदले आदी उपस्थित होते.

## शेवगाव नगराध्यक्षपदी माया मुंढे; ६६ वर्षांनंतर नगरपरिषदेवर भगवा

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव नगर परिषद निवडणुकीत शिवसेनेने ऐतिहासिक विजय नोंदवत नगराध्यक्षपद पटकावले असून, तब्बल ६६ वर्षांनंतर प्रथमच शिवसेनेचा भगवा झेंडा शेवगाव नगरपरिषदेवर फडकला आहे.

या विजयामुळे शेवगावच्या राजकारणात मोठा बदल घडून आला असून जिल्हाभरात या निकालाची जोरदार चर्चा सुरू आहे. नगराध्यक्ष पदाच्या थेट निवडणुकीत शिवसेनेच्या माया अरुण मुंढे यांनी ६५९१ मते मिळवत विजय संपादन केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या विद्या अरुण लांडे यांना ६५०५ मते मिळाली असून त्यांचा अवघ्या ८६ मतांनी पराभव झाला. भाजपाच्या फलके रत्नमाला महेश यांना ५४४१ मते, तर राष्ट्रवादी (शरद पवार) गटाच्या काझी परवीन यांना ५४३८ मते मिळाली. एकूण मतदान : २४,५२१ या निवडणुकीत माजी जिल्हा परिषद




सदस्य हर्षदा काकडे व शिवाजीराव काकडे यांनी शिवसेनेत केलेल्या प्रवेशाचा मोठा फायदा शिवसेनेला झाला. त्यांच्या स्थानिक प्रभावामुळे व कार्यकर्त्यांच्या ताकदीमुळे अनेक प्रभागांत शिवसेनेच्या मतांमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले.

निवडणुकीत सर्वात जास्त फायदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शेवगावातील जाहीर सभेचा झाला, अशी एकमुखी चर्चा आहे. सभेनंतर प्रचाराला वेग आला, कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आणि मतदारांमध्ये शिवसेनेबाबत सकारात्मक वातावरण तयार झाले. शिवसेनेने बारीक-बारीक नियोजन, बूथनिहाय संपर्क, घराघरात प्रचार, सामान्य मतदारांच्या प्रश्नांवर भर अशी रणनीती राबवत विजय खेचून आणला. भाजपातील अंतर्गत गटबाजी, तिकीट वाटपावरील नाराजी आणि समन्वयाचा अभाव याचा थेट फटका भाजपाला बसला. भाजपाने तिकीट नाकारल्यानंतर शिवसेनेच्या तिकिटावर निवडणूक लढवलेल्या

**शेवगावच्या जनतेने दाखवलेला विश्वास मी कधीही ढळू देणार नाही. हा विजय सर्वसामान्य नागरिकांचा आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचा आहे. शेवगावचा विकास व पारदर्शक कारभार हेच माझे प्राधान्य राहील.**

**- माया अरुण मुंढे**

नवनिर्वाचित नगराध्यक्ष, शिवसेना

माया अरुण मुंढे यांनी नगराध्यक्षपद जिंकणे, हा भाजपासाठी मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

**नगर परिषदेत पक्षनिहाय जागा-** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) १०, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) ४ भाजपा ७, शिवसेना ३ संख्याबळ कमी असतानाही नगराध्यक्षपद शिवसेनेकडे जाणे, हे राजकीय चाणाक्षपणाचे उदाहरण ठरले आहे.

